सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड इमारत, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.
Email Id: contact-secretary@mpsc.gov.in Website: https://mpsc.gov.in, https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc ०२२-६९३८५९००

क्रमांक : एलजेआर-१९२६/प्र.क्र.२४/२०२६/जाहिरात दिनांक : ०५ ऑगस्ट , २०२६

**-:प्रसिद्धीपत्रक:-**

**विषय : मुंबईचे नगरपाल (शेरिफ) कार्यालयातील बेलिफ-लिपिक, गट-क स्पर्धा परीक्षा २०२६** च्या आयोजनाच्या दिनांकाबाबत

**संदर्भ :** जाहिरात क्रमांक ०१५/२०२६, दिनांक १५ जून, २०२६

मुंबईचे नगरपाल (शेरिफ) कार्यालयातील बेलिफ-लिपिक, गट-क स्पर्धा परीक्षा २०२६ संवर्गाकरीता जाहिरात दिनांक १५ जून, २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**२.** प्रस्तुत संवर्गाची निवडप्रक्रिया कालमर्यादेत पूर्ण करण्याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी एका याचिकेप्रकरणी निर्देश दिले आहेत. त्यानुषंगाने आयोगाकडून देण्यात आलेल्या भरतीप्रक्रियेची कालमर्यादा/ तपशीलवार वेळापत्रक शासनाच्या विधी व न्याय विभागामार्फत मा. उच्च न्यायालयात सादर केले आहे.

**३.** सदर वेळापत्रकानुसार भरतीप्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करणे आवश्यक ठरत असल्याने विषयांकित जाहिरातीस अनुसरुन स्पर्धा परीक्षा खाली नमूद केलेल्या दिनांकास व जिल्हा केंद्रावर आयोजित करण्यात येईल:-

| जाहिरात क्रमांक | संवर्ग | जिल्हा केंद्र | परीक्षेचा वार व दिनांक | पेपर क्रमांक आणि प्रत्यक्ष कालावधी |
|---|---|---|---|---|
| ०१५/२०२६ | मुंबईचे नगरपाल (शेरिफ) कार्यालयातील बेलिफ-लिपिक, गट-क स्पर्धा परीक्षा २०२६ | अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, नाशिक, नवी मुंबई व पुणे | रविवार, दिनांक ०६ सप्टेंबर, २०२६ | पेपर १ – सकाळी ११.०० ते १२.००<br>पेपर २ – दुपारी ३.०० ते ४.०० |

**४.** अभ्यासक्रम, निवडप्रक्रिया इत्यादी तपशील आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केल्याप्रमाणे राहील.

**५.** जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना स्थायी/कायमस्वरुपी निवासाच्या तपशीलाच्या आधारे जिल्हाकेंद्र उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यानुषंगाने उमेदवारांना प्रवेश प्रमाणपत्रे ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे परीक्षेपूर्वी ०७ दिवस आधी त्यांच्या प्रोफाईलमध्ये उपलब्ध करुन देण्यात येतील.

**६.** दिनांक १५ जून, २०२६ रोजी प्रसिद्ध मूळ जाहिरातीमधील व दिनांक ३० जून, २०२६ रोजीच्या शुद्धीपत्रकातील इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही.

सं.पां.देशमुख
उप सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई